# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

क्र. झोपुप्रा/प्रशासन/४०४/२०२६
दिनांक – 07 OCT 2026

## दरपत्रक सूचना

मुंबई महानगर प्रदेश झोपडपपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे (प.) येथील मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयाच्या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती नोंदवण्यासाठी या कार्यालयात नवीन बायोमेट्रिक (दोन फेस रिडींग मशिन आणि सॉफ्टवेअर) यंत्रणा बसवणेसाठी दरकरार करणेबाबत खालील अटी व शर्तीची पूर्तता व पात्रता धारण करणाऱ्या पुरवठा धारकांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**तांत्रिक बाबी (आवश्यक)**

१. हार्डवेअर निकष :

- मशीनचा प्रकार : Wall-Mounted Face Recognition Terminal
- चेहरा ओळखण्याची क्षमता : किमान २०० कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्याची क्षमता (कार्यालयातील विद्यमान कर्मचारी व भविष्यातील वाढीव कर्मचारी लक्षात घेता). फिंगरप्रिंट सेन्सर वैकल्पिक.
- नोंदींची क्षमता (Log Capacity): किमान 10,000 उपस्थिती नोंदी साठवण्याची क्षमता.
- इंटरनेट सेवेच्या उपलब्धतेअभावी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची नोंद होणे तसेच त्याचा तपशील प्रणालीमध्ये सुरक्षीत रहाणे आवश्यक आहे
- चेहरा ओळखण्याची गती : ५ सेकंदापेक्षा कमी. उपस्थिती नोंदवताना कर्मचाऱ्याला कोणताही 'Attendance ID' टाकण्याची आवश्यकता नसावी.
- डिस्प्ले : कलर डिस्प्ले
- कॅमेरा : चांगल्या लेन्सचा कॅमेरा जो अंधारात किंवा कमी प्रकाशातही अचूक चेहरा ओळखू शकेल. जेणेकरून फोटो किंवा मोबाईल मधील चेहऱ्यावरून डमी उपस्थिती लावता येणार नाही.
- संपर्क प्रणाली : TCP/IP LAN संपर्क प्रणाली अनिवार्य आणि Wi-Fi Connectivity वैकल्पिक. डेटा ट्रान्सफरसाठी USB Port वैकल्पिक.

२. **सॉफ्टवेअर आणि अहवाल निकष :**

- डॅशबोर्ड : मशिन्ससोबत कर्मचारी उपस्थितीचे संनियंत्रण करण्यासाठी सॉफ्टवेअर/वेब डॅशबोर्ड उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील.
- अहवाल : कर्मचाऱ्यांचे दैनंदिन उपस्थिती अहवाल (In-Out दोन्ही), मासिक उपस्थिती अहवाल, उशिरा उपस्थिती अहवाल, अनुपस्थिती अहवाल, शिफ्टनुसार उपस्थिती अहवाल Excel आणि PDF फॉरमॅटमध्ये तयार करण्याची सुविधा असावी.
- बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली प्राधिकरणाच्या वेतन प्रणालीशी संलग्न करणे आवश्यक.
- माहिती सुरक्षा : बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधील माहिती एनक्रिप्टेड (Encrypted) असावी तसेच लॉगीनद्वारे सुरक्षित असावी.
- इंटरनेट सेवेच्या उपलब्धतेअभावी उपस्थिती नोंदीचा तपशील प्रणालीमध्ये सुरक्षीत रहाणे आवश्यक आहे

३. प्रशासकीय आणि इतर निकष :

- बनावट : बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली मशीनची बनावट 'मेक इन इंडिया' (Make in India) धोरणांतर्गत असल्यास प्राधान्य.
- प्रमाणपत्रे : मशीन योग्य मानांकनानुसार प्रमाणित असावी.

**हमी कालावधी (Warranty):** बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधील मशीन आणि सॉफ्टवेअरवर किमान १ वर्ष सर्वसमावेशक हमी असणे अनिवार्य आहे. एक वर्षानंतरचे देखभालविषयक दर- एक वर्षाचा हमी कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखभाल/दुरूस्तीसंदर्भातील कार्यवाही/दर नमूद करणे आवश्यक असेल.

**इन्स्टॉलेशन व प्रशिक्षण** : बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधील मशीन कार्यालयात बसवणे, वायरिंग आणि कर्मचाऱ्यांना सॉफ्टवेअर वापरण्याबाबतचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची राहील.

अतांत्रिक बाबी

- पुरवठाधारकांनी संस्थेचा PAN CARD / GST No. ची सांक्षाकित प्रत सादर करणे आवश्यक.
- खालील तक्त्यामधील पुरवठा करण्यात येणाऱ्या नमूद साहित्य हे नमूद विवरणानुसार राहील आणि दर करारचा कालावधी कमीत कमी एक वर्षाचा राहील.
- निविदा दर सादर करताना GST वगळून सादर करणे आवश्यक राहील.
- पुरवठा आदेश मिळाल्यावर पुढील सात दिवसात ५०० रुपये च्या मुद्रांकावर अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल व त्याचा खर्च पुरवठा धारकास करावा लागेल.
- सेवा समाधानकारक असल्यास उपरोक्त दरानुसार सेवा देण्याच्या अधीन राहून दरकरार जास्तीत जास्त एक वर्ष वाढवून दिला जाईल.
- एका निविदा धारकाने एकच निविदा सादर करावी व तसे प्रमाणपत्र द्यावे.
- परिपूर्ण देयक सादर करण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.
- आपण देयके पुरवठा झाल्यावर विनाविलंब खरेदी अधिकारी यांना सादर करावी. सदर देयकातून नियमानुसार TDS रकमा वसूल केल्या जातील.
- देयक सादर करताना GST क्रमांकासह सादर करावे.
- दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई न लावणे तसेच, कोणती निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार प्रधिकरणाने राखून ठेवले आहेत.

तरी, इच्छूक पुरवठाधारकांनी आपली दरपत्रके मुंबई महानगर प्रदेश झोपडपपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा ठाणे (प.), येथे **दि.२१/१०/२०२६** पर्यंत संध्याकाळी **५.०० वाजेपर्यंत** सादर करावीत.

Kalpana

(कल्पना जगताप)

**सचिव**

**मुंबई महानगर प्रदेश**

**झोपडपपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**

ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल,मानपाडा,ग्लॅडी अल्वारी रस्ता ठाणे(पश्चिम) -४०० ६१०

दूरध्वनी क्र.०२२-४१३५६८४०, E-mail ID-adminoftmmr@sra.gov.